# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

(दुरध्वान:०२३१-२५२१०३८) विद्यानगर कोल्हापूर (फॅक्स: ०२३१-२५२१०१६)

ई-मेल: gpkolhapur@yahoo.com **परीक्षा विभाग** संकेत स्थळ www.gpkolhapur.org.in


जा.क्र.शांतनिको/पवि/२०१७/ दि. १३.०६.२०१७

# विद्यार्थ्यांना सुचना

**विषय :- विषय नोंदणी व परीक्षा अर्ज भरणेबाबत... (R , R+RR)**

सर्व नियमित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, सम सत्र परीक्षेचा निकाल दि.०९/०६/२०१७ रोजी जाहीर करणेत आला आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषम सत्राच्या विषयाची नोंदणी व परीक्षा अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Date | Programme (Both Shifts) |
|---|---|
| 27/06/2017 To 05/07/2017 | All Programme |

१) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या सांकेतीक स्थळावर (www.gpkolhapur.org.in) त्यांचे माहिती पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो,ई-मेल अॅड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपुर्वक भरावी. ज्या विद्यार्थ्यांनी ही माहिती पूर्वी भरलेली आहे त्यांनी पुन्हा भरणेची आवश्यकता नाही.

२) आपला पासवर्ड विद्यार्थ्यांनी गोपनिय ठेवावा जेणेकरुन पुढील सर्व शैक्षणिक कामकाज त्यांना सुरळीतपणे पार-पाडता येईल.

३) सर्व विद्यार्थ्यांनी विषम सत्र २०१७ विषय नोंदणी/पुनःनोंदणी संबंधी आपल्या विभागातील नोंदणी अधिकारी यांच्याशी संपर्क साधुन योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा. Detain झालेल्या विषयांची नोंदणी पुन्हा R म्हणून करुन विद्यार्थ्यांने त्याचे सत्र कर्म पुर्ण करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

४) एकदा विषय नोंदणी /परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांने ऑनलाईन **Save** केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत विषय नोंदणी अधिकारी / वर्ग-शिक्षक यांचे कडुन बदल करुन घ्यावा व तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करुन सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

५) गुण पडताळणी/फोटोकॉपी साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधीत निकालाच्या अधिन राहुन विभागातील विषय नोंदणी अधिकारी/वर्ग-शिक्षक/विभाग प्रमुख यांचेकडे तदानुषांगिक आशयाचा (विषय नोंदणी/पुनःनोंदणी बदल,विषयाच्या थेअरी/प्रॅक्टिकलचे क्लास अटेंड करणे ई.) अर्ज करुन पुर्व परवानगी घेऊन ठेवावी. जेणेकरुन संभाव्य शैक्षणिक व आर्थिक नुकसान (लेट फी) टाळता येईल.

६) गुण पडताळणी/ फोटोकॉपीचा निकाल जाहीर झालेनंतर त्यानुसार परीक्षा विभागात अर्ज करुन मुळ गुण पत्रिका जमा करावी व सुधारीत गुण पत्रिका, विषय नोंदणी/विषय पुनःर्नोंदणीमध्ये आवश्यक तो बदल परीक्षा विभागामार्फत करुन घ्यावा. तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करुन सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

७) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरलेनंतर विषयनोंदणी/परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पध्दतीने आकारणेसाठी विद्यार्थी विभागाशी संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. फी पावतीची छापील प्रत घ्यावी. या पावतीची दुय्यम प्रत व विषयनोंदणी अर्ज विभागातील विषय नोंदणी अधिकारी यांच्याकडे कायम करणेसाठी (confirm ) जमा करावे. विषय नोंदणी अधिकाऱ्यानी अर्ज कायम (confirm ) केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापुर

प्रत:-

१.सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..
२.रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
३.सर्व विभागाना जाहीर करणेसाठी